# भेंडीवरील किडी आणि रोगांचा बंदोबस्त



**प्रा. प्रेरणा अभंग**
(मो.नं. ९९२३१०२०६८)
कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय,
लोणी, ता. राहाता जि. अहमदनगर

**भें**डी या पिकावर पडणाऱ्या किडी आणि रोगांमुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान होते. या विषयीच्या व्यवस्थापनाची माहिती प्रस्तुत लेखात दिली आहे.

**मावा** : या किडीच्या प्रादुर्भावामुळे रोपांची वाढ खुंटते आणि पाने निस्तेज दिसतात.

**तुडतडे** : पिकांच्या सर्व अवस्थांमध्ये येणारी ही कीड आहे. तुडतडे पानावर राहून आतील रस शोषून घेतात त्यामुळे पाने विटकरी तांबडी झालेली दिसतात.

**पांढरी माशी** : आकाराने छोटी, पिवळे शरीर व पांढरे पंख असलेली ही कीड पानांतून रस शोषून पिकाला हानी पोहोचवते. तसेच या माशीमुळे विषाणुजन्य रोगांचा प्रसार होतो.



**शेंडा व फळ पोखरणारी अळी** : यामध्ये अळी कोवळ्या शेंड्यावर छिद्र पाडून आत शिरते, त्यामुळे कोवळे शेंडे सुकून जातात. नंतर अळी फळात शिरुन आतील भाग खाते.

**नियंत्रण** : उन्हाळ्यामध्ये खोल नांगरट करावी म्हणजे जमिनीतील किडींच्या सुप्त अवस्था उन्हामुळे तसेच पक्ष्यांनी खाल्ल्यामुळे नष्ट होतील. नत्राचा अतिरिक्त वापर करू नये. पिकांची फेरपालट करावी. कीडग्रस्त भेंडी तोडून अळीसहित नष्ट करावी. लागवडीपूर्वी ७०% थायोमिथॉक्झॉम किंवा इमिडाक्लोप्रिड ५ ग्रॅम प्रतिकिलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.

शेंडा व फळ पोखरणाऱ्या अळीसाठी १० मीटर अंतरावर १ याप्रमाणे प्रतिहेक्टरी १५ कामगंध सापळे लावावेत. तसेच ट्रायकोग्रामा चिलोनिस या मित्रकीटकाचा वापर करावा. (प्रतिहेक्टरी दीड लाख अंडी.)

इमामेक्टिन बेंजोएट ५ एसजी, ३५ ग्रॅम क्विनॉलफॉस २५ ईसी– २ मि.लि. प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारावे.

**भुरी** : हा बुरशीजन्य रोग असून या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास पानांच्या वरील बाजूस पांढरी पावडर दिसते. पाने पिवळी पडतात, गळून पडतात आणि पिकांमध्ये फळधारणा होत नाही.

**उपाय** : प्रतिहेक्टरी ३० किलो गंधकाची धुरळणी करावी. तसेच १० लिटर पाण्यात ५ ग्रॅम कॅलिक्झिन किंवा २५ ग्रॅम पाण्यात मिसळणारे गंधक फवारावे.

**येलो व्हेन मोझॅक** : हा विषाणूजन्य रोग असून पानाच्या शिरा पूर्णपणे पिवळ्या पडतात. पाने पिवळी पडून त्यांचा आकार बारीक होतो आणि झाडांची वाढ खुंटते; यामध्ये फळधारणा होत नाही आणि झाली तरी फळ हे लहान व कडक बनते. यामुळे अशा फळांना बाजारात जास्त मागणी नसते.

**उपाय** : अर्का अनामिका, परभणी क्रांती, पुसा सावनी, जनार्दन हरिता, अर्का अभय यांसारख्या रोगप्रतिकारक वाणांचा वापर करावा. पिवळ्या रंगाचे चिकट सापळे लावावेत. तसेच पांढ्या माशीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मोनॉक्रोटोफोस १.५ मि.लि., डायमिथोएट किंवा मिथिल डिमिटोन २ मि.लि. प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारावे.

**पानावरील ठिपके** : पानावर तपकिरी काळ्या रंगाचे वेडेवाकडे ठिपके दिसून येतात.

**उपाय** : रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास झायनेब व मॅन्कोझेब २ मि.लि., कार्बेन्डॉझिम १ मि.लि. प्रतिलिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. ■